# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

**पार्श्वभूमी:**

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण २०१८" जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. सदर धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्थेच्या विकासाकरिता पोषक वातावरणनिर्मिती करुन त्यातून यशस्वी नवउद्योजक घडविण्याकरिता इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व स्टार्टअप्सना बौद्धिक मालमत्ता हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

नविन्यता, कल्पकता यांना भौगोलिकतेच्या मर्यादा नसतात, त्या कुठेही यशस्वी होऊ शकतात. नवकल्पनांना योग्य पाठबळ मिळण्याची आवश्यकता असते परंतु योग्य व्यासपीठ व मार्गदर्शनाअभावी चांगल्या कल्पना प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी विभागामार्फत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात येत आहे.

**उद्दिष्ट**

राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरवणे हे महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**पात्रता:**

१. सर्व पदवी पदव्युत्तर पदविकेचे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी (शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी वगळता) तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी /विद्यार्थिनी / जास्तीत जास्त ३ विद्यार्थ्यांचा समूह
२. अर्ज करण्यासाठी विद्यार्थी /विद्यार्थिनी /समूहाकडे नावीन्यपूर्ण संकल्पना असणे आवश्यक आहे

**टप्पे**

- टप्पा १: संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड
- टप्पा २: जिल्हास्तरीय सादरीकरण व संकल्पनांची निवड
- टप्पा ३: विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम

**लाभ व पारितोषिके**

- तालुकास्तरावर उत्तम ३ विजेत्यांना रोख पारितोषिके
- जिल्हास्तरावर सर्वोत्तम १० विजेत्यांना प्रत्येकी रु. १ लाखांचे बीज भांडवल
- राज्यस्तरावर सर्वोत्तम १० विजेत्या नवउद्योजकांना प्रत्येकी रु. ५ लाखांचे बीज भांडवल
- विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम
- इतर योजनांचा लाभ
- शैक्षणिक संस्था आणि जिल्ह्यांना पारितोषिके

## टप्पा १: संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड

- शैक्षणिक संस्थांची नोंदणी
- विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी
- संस्था स्तरावर सादरीकरण
- प्रत्येक संस्थेतील सर्वोत्कृष्ट २ संकल्पनांची निवड
- प्रत्येक तालुक्यात उत्तम ३ संकल्पनांना रोख पारितोषिके

## टप्पा २: जिल्हास्तरीय सादरीकरण व संकल्पनांची निवड

- प्रत्येक जिल्ह्यातील उत्तम १०० संकल्पनांची सादरीकरणासाठी निवड
- १०० संकल्पनांची प्रशिक्षण कार्यशाळा
- १०० संकल्पनांचे जिल्हास्तरावर सादरीकरण
- जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांची निवड
  १० विजेत्यांना १ लाख रुपयांचे बीज भांडवल

## टप्पा ३: विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम

- प्रत्येक जिल्ह्यातील १० अश्या एकूण ३६० नवउद्योजकांना १२ महिन्यांचा विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम
- इन्क्युबेशन प्रोग्राम नंतर ३६० संकल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण
- उत्तम १० विजेत्यांना रु. ५ लाखांचे बीज भांडवल

**प्रक्रिया:**

**१. महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजची घोषणा व बैठकांचे आयोजन (१५ जुलै २०२३)**

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचा शुभारंभ दि १५ जुलै २०२३ रोजी मंत्री कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता यांच्या हस्ते झाला. सदर उपक्रमाच्या प्रचार प्रसिद्धी व यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांनी २४ जुलै ते २८ जुलै २०२३ दरम्यान आपल्या जिल्हयातील सर्व आयटीआय ,महाविद्यालये, विद्यापीठे यांचे प्राचार्य व कुलगुरू यांची VC द्वारे अथवा प्रत्यक्ष बैठक घ्यावी.

सदर बैठकीचे आयोजन जिल्हा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता समितीने करावी. बैठकीची जबाबदारी सहाय्यक आयुक्त रोजगार यांची राहील. सदर बैठकीस सर्व कुलगुरू, प्राचार्य, उच्च व तंत्र शिक्षणचे संबंधित विभागीय अधिकारी यांना आमंत्रित करावे. सदर बैठकीमध्ये महात्मा गांधी फेलो/ DSDC यांनी मार्गदर्शक सुचनांचे वाचन करून उपक्रमा संबंधित सर्व नियमावलीविषयी उपस्थितांना अवगत करावे. सदर उपक्रमविषयीची जिल्हास्तरीय प्रचार प्रसिद्धी जिल्हा माहिती अधिकारी यांच्या मार्फत करण्यात यावी.

**२. महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नोंदणी (१५ जुलै ते १५ ऑगस्ट २०२३)**

स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजमधे सहभाग घेण्यासाठी राज्यातील सर्व महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) विहित काळामध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. याबाबतचे माहितीपत्रक सोबत जोडण्यात येत आहे.

**३. विद्यार्थ्यांकडून अर्जाची मागणी (१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२३)**

सर्व नोंदणी केलेल्या संस्थांमधील विद्यार्थ्यांना स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) अर्ज करता येईल.

**४. संस्था स्तरावर सादरीकरण आणि छाननी (१० सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२३)**

प्रत्येक शैक्षणिक संस्था सहभागी उमेदवारांसाठी सादरीकरण सत्र आयोजित करेल. या सत्रामध्ये जूरी म्हणून संबंधित शैक्षणिक संस्थेतील उद्योजकता विषय पाहणारे शिक्षक/प्राध्यापक काम करतील अथवा संस्थेने निर्देशित केलेली व्यक्ती काम पाहील. स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) मूल्यांकन निकष संस्थांना दिलेले असून, सदर पोर्टलवर प्राप्त अर्जांचे मूल्यांकन शैक्षणीक संस्थेमार्फत करण्यात येईल. या साठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेला log In ID व पासवर्ड महाराष्ट्रअ राज्य नाविन्यता सोसायटीद्वारे पुरवला जाईल.

**५. शैक्षणिक संस्था स्तरावर उत्कृष्ट २ संकल्पनांची निवड (२३ सप्टेंबर २०२३)**

शैक्षणिक संस्था स्तरावरील सादरीकरण सत्रानंतर प्रत्येक संस्थेतील सर्वोत्तम २ संकल्पनांची निवड करण्यात येईल. ही निवड विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारे करण्यात येईल.

**६. प्रत्येक तालुक्यात उत्तम ३ संकल्पनांना रोख पारितोषिके ( २४ सप्टेंबर २०२३ )**

प्रत्येक तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेल्या संकल्पनांमधून, सर्वोत्कृष्ट ३ संकल्पनांना रोख पारितोषिके देण्यात येतील. (प्रथम रु ३०००, द्वितीय रु २०००, तृतीय रु १०००)

**७. प्रत्येक जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट १०० नवसंकल्पनांची निवड (२५ सप्टेंबर २०२३)**

जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेल्या सर्वोत्तम २ संकल्पनांमधून, सर्वोत्कृष्ट १०० संकल्पनांची जिल्हास्तरीय सादरीकरणासाठी निवड करण्यात येईल.

**८. प्रशिक्षण कार्यशाळा (२७ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२३)**

निवडलेल्या १०० नवउद्योजकांसाठी, स्टार्टअप प्रवासाच्या मूलभूत गोष्टींबद्दल माहिती आणि सादरीकरण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी, १ दिवसीय आभासी/प्रत्यक्ष कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. या कार्यशाळेविषयीची माहिती निवडक विद्यार्थ्यांना SMS अथवा ईमेलद्वारे देण्यात येईल.

**९. जिल्हास्तरावर सादरीकरण सत्र (६ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२३)**

प्रत्येक जिल्हास्तरावर निवडलेल्या १०० नवउद्योजकांना सादरीकरणाची संधी दिली जाईल. सहभागींचे मूल्यांकन करण्यासाठी प्रत्येक जिल्हा विविध ज्युरी पॅनेल तयार करेल व स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) सदर मूल्यांकन करण्यात येईल.

**१०. जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांची निवड (१८ ऑक्टोबर २०२३)**

प्रत्येक जिल्ह्यातील सादरीकरण सत्रातून १० विजेते निवडले जातील. यामधे ३०% महिला व ५०% विजेते हे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून असतील. १० विजेत्यांमधे One District One Product (ODOP) संबंधित नवसंकल्पना असल्यास २ विजेत्यांना प्राधान्य देण्यात येईल. प्रत्येक विजेत्याला रु. १ लाख बीज भांडवल मिळेल.

**११. विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम:**

प्रत्येक जिल्ह्यातील १० अश्या एकूण ३६० नवउद्योजकांना १२ महिन्यांचा विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम.

१२. इन्क्युबेशन प्रोग्राम नंतर ३६० संकल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण करण्यात येईल व सर्वोत्कृष्ट १० नवउद्योजकांना प्रत्येकी रु. ५ लाखांचे बीज भांडवल देण्यात येईल.

**शैक्षणिक संस्था आणि जिल्ह्यांना पारितोषिके**

१. प्रत्येक प्रशासकीय विभागातील सर्वाधिक अर्ज प्राप्त झालेल्या जिल्ह्याला ५०,००० रोख रक्कम देऊन पुरस्कृत केले जाईल.

**जिल्ह्यातील एकूण नोंदणीकृत संस्थांची संख्या**

= ------------------------------------------------------------------------

**जिल्ह्यातील एकूण पात्र शैक्षणिक संस्थांची संख्या**

२. प्रत्येक प्रशासकीय विभागातील सर्वाधिक अर्ज प्राप्त संस्थेला, रु. ५०,००० रोख रक्कम देऊन पुरस्कृत केले जाईल.

**संस्थेतील अर्जांची एकूण संख्या**

= ------------------------------------------------------------------------

**शैक्षणिक संस्थेमधील एकूण विद्यार्थ्यांची संख्या**

**प्रमाणपत्रे**

सर्व सहभागी, संस्था, ज्युरी सदस्य आणि स्वयंसेवक यांना डिजिटल प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील.

**प्रस्तावित वेळापत्रक:**

| **पहिला टप्पा : संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड** | |
|---|---|
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जुलै - ३१ ऑगस्ट २०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | १ ऑगस्ट - १५ सप्टेंबर |
| संस्था स्तरावर सादरीकरण सत्र | २५ सप्टेंबर - १० ऑक्टोबर |
| संस्थानिहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | १३ ऑक्टोबर |
| प्रत्येक तालुक्यात उत्तम ३ संकल्पनांची निवड | १६ ऑक्टोबर |
| **दुसरा टप्पा** | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | १७ ऑक्टोबर |
| प्रशिक्षण सत्र | १९ ऑक्टोबर - ३० ऑक्टोबर |
| जिल्हास्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | १ नोव्हेंबर - १५ नोव्हेंबर |
| प्रत्येक जिल्ह्यातून १० विजेत्यांची घोषणा | २० नोव्हेंबर |
| **तिसरा टप्पा** | |
| इन्क्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करून इन्क्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इन्क्युबेशन सहाय्य |
| इन्क्युबेशन प्रोग्राम | |
| राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | |

**जिल्हास्तरीय सादरीकरण सत्रासाठी ज्यूरी नोंदणी प्रक्रिया**

१. इच्छुक तज्ञांनी स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) नोंद करावी.
२. प्राप्त अर्जांपैकी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी योग्य ज्युरींची जिल्हानिहाय नियुक्ती करेल.
३. जिल्हास्तरीय सादरीकरण सत्रांसाठी जिल्हास्तरावर ज्युरी पॅनेल तयार केले जातील.
४. ज्युरी सदस्यांना सादरीकरण सत्रातील त्यांच्या योगदानासाठी प्रती दिवशी रु. २००० चे मानधन मिळेल.

**विविध भागधारकांच्या जबाबदाऱ्या**

| भागधारक | जबाबदारी |
|---|---|
| महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी | • स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलची निर्मिती<br>• अंमलबाजवणीसाठी मार्गदर्शक तत्वे निर्गमित करणे<br>• स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज बाबत सर्व संबंधित शासकीय विभाग व इतर भागीदारांना माहिती व समन्वय साधने.<br>• जिल्हास्तरीय विजेत्यांना बीज भांडवल, जुरींना मानधन व इतर खर्चाची पूर्तता करणे.<br>• विशेष इनक्युबेशन सहाय्य, नाविन्यता परिसंस्थेमधील प्रमुख संस्था आणि तज्ञांकडून मार्गदर्शन सत्रे आणि सॉफ्टवेअर क्रेडिट्स, क्लाउड क्रेडिट्स यांसारखे इतर फायदे प्रदान करणे |
| जिल्हाधिकारी | • जिल्हास्तरीय यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शन<br>• Press Conference, शैक्षणिक संस्थां व इतर भागीदारांशी बैठक |
| जिल्हा कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता कार्य समिती | • जिल्हा स्तरावर महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजमचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी नोडल ऑफिसरची नियुक्ती<br>• स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजबद्दल माहिती जिल्हाभरातील जास्तीत जास्त शैक्षणिक संस्थां व विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवणे आणि त्यांना योग्य तयारीसाठी प्रोत्साहित करणे.<br>• जिल्हास्तरीय सादरीकरण सत्रांसाठी प्रस्तावित महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थाच्या ठिकाणी आवश्यक वस्तूची (मध्यवर्ती सभागृह, सादरीकरणासाठी स्वतंत्र खोली, प्रोजेक्टर आणि इतर पायाभूत सुविधा पडताळणी आणि खात्री करणे.<br>• जिल्ह्यातील प्रसिद्धी आणि जनजागृती मोहीम तसेच मार्गदर्शन आणि प्रशिक्षण शिबिराविषयी वृत्तपत्रे आणि सोशल मीडियाद्वारे माहिती प्रसारित करणे,<br>• जिल्हास्तरीय प्रचार प्रसारासाठी पालकमंत्री, आमदारांशी समन्वय साधणे यात्रा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक सहाय्य प्रदान करणे |
| सहाय्यक आयुक्त रोजगार, महात्मा गांधी नॅशनल फेलो, DSDC | • महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी आणि इतर भागधारकांशी प्रभावी समन्वय साधण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करणे<br>• महात्मा गांधी नॅशनल फेलो व DSDC यांच्या मदतीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व कुलगुरू, प्राचार्य, उच्च व तंत्र शिक्षणचे संबंधित विभागीय अधिकारी यांच्या बैठकीचे आयोजन करणे.<br>• जिल्ह्यात प्रचारासाठी स्थानिक वृतपत्रे आणि इतर माध्यमाद्वारे माहितीचा प्रसार<br>• प्रचार आणि जनजागृती मोहिमांसाठी संबंधित जिल्ह्यातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्थां, प्राचार्य, इन्क्युबेशन संस्था, केंद्राशी समन्वय साधणे<br>• संबंधित जिल्ह्यातील कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधणे तसेच जास्तीत जास्त सहभागासाठी इतर शासकीय विभागांशी समन्वय साधणे<br>• नोंदणी मोहीम |
| विशेष इनक्युबेशन प्रोग्राम - अंमलबजावणी भागीदार | • महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या अंमलबजावणीदरम्यान ते नॉलेज पार्टनर म्हणूनही काम करतील.<br>• निवडलेल्या ३६० जिल्हास्तरीय विजेत्यासाठी ऑनलाइन प्रशिक्षण, मास्टरक्लास आणि हँडहोल्डिंगसह विशेष इनक्युबेशन कार्यक्रम चालवेल<br>• अंमलबजावणी भागीदार संबंधित स्थानिक इन्क्युबेशन भागीदाराची निवड करेल. |

| भागधारक | जबाबदारी |
|---|---|
| | • स्थानिक इनक्युबेशन केंद्राशी योग्य समन्वय आणि नियोजनासह इनक्युबेशन समर्थनाचे सुरळीत कार्य सुनिश्चित करेल<br>• स्थानिक इनक्युबेशन केंद्रात स्टार्टअपच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा आणि अहवाल |
| स्थानिक इनक्युबेशन भागीदार | • इन्क्युबेशन सेंटर हे महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी मान्यताप्राप्त किंवा राज्यातील इतर कोणतेही इनक्युबेशन सेंटर असू शकते.<br>• प्रत्येक स्थानिक इनक्यूबेटर जिल्ह्यातून जास्तीत जास्त १० स्टार्टअप इनक्युबेट करेल आणि १२ महिन्यांच्या कालावधीत त्यावर काम करेल.<br>• स्थानिक इनक्युबेशन भागीदार इनक्युबेशन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अमलबजावणी भागीदारासोबत जवळून काम करेल<br>• जिल्हास्तरीय सादरीकरणापूर्वी मूल्यमापन समितीसाठी तज्ज्ञांची नियुक्ती करणे<br>• इन्क्युबेशन भागीदार सदर काळात नउद्योजकाकडून कोणतीही equity ठेवणार नाही आणि या समूहातील इनोव्हेटर्सकडून कोणतेही शुल्क आकारणार नाही. |
| ITI महाविद्यालये, शैक्षणिक संस्था | • विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्रमाबद्दल जागरूकता निर्माण करणे.<br>• विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास प्रवृत्त करणे<br>• अर्जदाराकडील सादरीकरणाचे मूल्यमापन करण्यासाठी ज्यूरीचे एक पॅनल तयार करणे<br>• महाविद्यालयीन स्तरावर सादरीकरण सत्र आयोजित करणे आणि जिल्हा प्रशासनाकडे २ संकल्पना पाठवणे |
| स्थळ भागीदार | • जिल्हास्तरीय सादरीकरणासाठी प्रस्तावित महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थाच्या ठिकाणी आवश्यक वस्तूंची (मध्यवर्ती सभागृह, सादरीकरणासाठी स्वतंत्र खोली प्रोजेक्टर आणि इतर पायाभूत सुविधा) पडताळणी आणि खात्री करणे.<br>• ज्या ठिकाणी सादरीकरण सत्र प्रस्तावित आहे त्या ठिकाणी पाणी, अल्पोपहार आणि स्वच्छतेसाठी पुरेशा सुविधांची व्यवस्था करणे. |
| १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग<br>२) तंत्रशिक्षण संचालनालय<br>३) कृषी विभाग<br>४) वैद्यकीय शिक्षण आणि औषधी विभाग<br>५) व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय | • महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीला त्यांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थाशी संवाद सुरू करण्यास मदत करणे |